
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय अकरावा , भाग दुसरा

## सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय अकरावा : भाग दुसरा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

पहा देहा भयाने धरले । मनही विषण्ण झाले । बुद्धिसी अंधारे आले । नि शुद्ध जाऊ पाहे ॥३६८॥
पण बा हे काहीच नाही । जो सदैव सच्चिदानंद पाही । त्या माझ्या आत्म्यासही । कापरे भरले ॥३६९॥
मज साक्षात्काराची गोडी । पण बोध लागला देशोधडी । गुरूशिष्य संबंधाची वाडी । उद्ध्वस्त झाली ॥३७०॥
तुझ्या या दर्शनाकारणं । पहा व्याकुळले माझे मन । घेण्या त्यासी सावरून । मी प्रयत्न करी ॥३७१॥
भगवंता तुजला पाहून । मी गेलो असे घाबरून । पण मला समज आता नवीन । आली असे ॥३७२॥
सुखाच्या त्या शोधात । जीव धावाधाव असे करत । परि थाराच नसे सापडत । येथे काही ॥३७३॥
पाहता या विश्वरूपाला । जगताचाच नाश झाला । बोलू नये त्या बोला । बोलावे लागते ॥३७४॥
पहा माझ्या डोळ्यासमोर । पसरला भयाचाच सागर । तुझी मुखे ती अपार । दिसती मजला ॥३७५॥
मुखी दात दाढांची दाटी । नच सामावे जी दोन ओठी । जशी शस्त्रांची दाट काटी । लागली असे ॥३७६॥
जैसे तक्षका विष भरले । कि काळरात्री भूत संचरले । कि अग्नेयास्त्र परजले । वज्राग्नी जैसे ॥३७७॥
भगवंता प्रचंड ही तुझी तोंडे । वरी आवेश पहा ओसंडे । जसे मरणाचे लोंढे । प्रकटले येथे ॥३७८॥
प्रचंड वारा संहारकाळीचा । आणि प्रलयाग्नी तो कल्पांतीचा । मेळ होता त्या दोघांचा । काय न जळे ॥३७९॥
पाहता तुझे भयंकर वदन । पहा धीर गेला मज सोडून । आता दिशांचेही ते ज्ञान । नाही मजला ॥३८०॥
थोडेसे विश्वरूप तुझे देखिले । आणि पहा सुख सोडून गेले । आता विश्वरूप ते आपले । आवर तू ॥३८१॥
जर माहीत असते मजला । विश्वरूपाचा आग्रह नसता धरला । वाचव पहा मजला । या प्रलयापासून ॥३८२॥
जर तू आमुचा रक्षणकर्ता । मग वाचव माझीया जीविता । आवरून पसारा मागुता । वाचव मजसी ॥३८३॥
हे पहा माझ्या भगवंता । तू विश्वाचाच असे कर्ता । परि ते विसरून का आता । संहार करसी ॥३८४॥
आता प्रसन्न ते होऊन । घे माया आपुली आवरून । आणि या महाभयापासून । वाचव मजला ॥३८५॥
पुन: पुन्हा भगवंता ती । मी करतसे विनंती । पाहून ती तुझी विश्वमूर्ती । मी भ्याड झालो ॥३८६॥
इंद्राच्या अमरावतीवरचा हल्ला । मी एकट्याने परतवला । भगवंता काळाला । न घाबरलो कधी ॥३८७॥
नाही हे साधे आजचे प्रकरण । त्या मृत्यूचाही बळी चढवून । जातो वाटते आमचा प्राण । विश्वासकट ॥३८८॥
अजून नाही प्रलयाची वेळ । अवचित तू प्रकटलासी काळ । आणि त्रिभुवन हे अखिल । संपू पाहे ॥३८९॥
शांतीची आशा होतो धरत । पण काय जाहले हे विपरीत । जाणू विश्वासीच असती गिळीत । आता तू ॥३९०॥
मज दिसे बघ प्रत्यक्षात । अनेक तोंडे तू वासत । आहेस सैन्यास बा गिळत । रणांगणी ॥३९१॥
पहा ते कौरवकुळीचे वीर । जे आंधळ्या धृतराष्ट्राचे कुमार । ते गेले पहा सहपरिवार । मुखात तुझ्या ॥३९२॥
मदतीला त्या कौरवांचे । राजे जे आले देशोदेशीचे । नामोनिशाण पहा त्या सर्वांचे । उरलेच नाही ॥३९३॥
पहा हत्ती सारे मदोन्मत्त । मुखी गिळून आहात टाकत । त्यावरच्या त्या माहुतांसकट । भगवंता तुम्ही ॥३९४॥
वीर ते तोफखान्याचे । आणि समुदाय पायदळाचे । भारेच्या भारे तयांचे । पहा मुखी नष्ट होती ॥३९५॥
जे यमाशी जवळीक सांगती । घास एक विश्वाचा करती । ऐसे कोट्यावधी शस्त्रे ती । गिळती तुम्ही ॥३९६॥
हत्ती रथ घोडे व सैन्ये । यासी दात न लावता गिळणे । यात संतोष तो कसा वाटणे । न कळे देवा ॥३९७॥
त्या भीष्मा ऐसा कवण । सत्य शौर्य निपुण । तोही आणि ब्राह्मण द्रोण । गिळला तुम्ही ॥३९८॥
त्या सूर्यदेवाचा कुमार । पहा गेला गेला तो कर्णवीर । आणि आमचे सारे वीर । संपले देवा ॥३९९॥
मी इच्छिले विश्वरूपाला । आणि कैसा अनर्थ हा झाला । घातले मी अवघ्या जगताला । मरणालागी ॥४००॥
आधी येणे सांगितल्या विभुति । आणि आता दाखवली भीति । उगाच केली मी विनंती । विश्वरूपाची ॥४०१॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

होणारे ते कधी न टळते । आणि बुद्धिही तशीच होते । जे माझ्या नशिबी होते । घडले पहा ॥४०२॥
त्या सागरमंथनात । अमृत आले होते हातात । पण देवांचे भरले नाही चित्त । म्हणून काढले विष ॥४०३॥
परंतु त्या समयास । शंभू धावून आला मदतीस । आणि त्या कालकुटविषास । प्राशिले त्याने ॥४०४॥
हा ज्वालामुखी कैसा आवरणे ।आता या विषा कोणी गिळणे ।आणि महाकाळासी खेळणे ।अवगत कोणा ॥४०५॥
ऐसा आपुल्याच दु:खात । अर्जुन होता तडफडत । पण हेतू नव्हता तो जाणत । भगवंताचा ॥४०६॥
मी मारल्यासच हे मरतात । तो होता ऐशा मनोभ्रमात । म्हणून पहा तो भगवंत । दाखवी लीला ॥४०७॥
येथे न मारतो कोणी कोणाला । मीच कारण सर्व संहाराला । हे शिकविण्या अर्जुनाला । दाविले रूप ॥४०८॥
पण भगवंताची ती करुणा । समजलीच नाही अर्जुना । आणि अकारण पावून अज्ञाना । घाबरला तो ॥४०९॥
पहा पहा हे काय आहे होत । दोन्ही सैन्ये गेली पहा तोंडात । जैसे अभ्र विरे आकाशात । तसे विरले सारे ॥४१०॥
त्या महाकल्पाच्या शेवटी । यम जसा नष्ट करी सृष्टी । देता एकवीस स्वर्ग पातळा मिठी । नष्ट सगळे ॥४११॥
जेधवा दैव प्रतिकूल होते । संपत्ती ती निघून जाते । तशी सृष्टी विलया जाते । कल्पांत काळी ॥४१२॥
पहा दोन्ही सैन्ये एकवटत । करती एकत्र प्रवेश मुखात । एकही तोंडातून नसे सुटत । पहा कर्म त्यांचे ॥४१३॥
अशोकवृक्ष जर शेंड्याला । उंटाने खुडून टाकला । मग वृक्ष वाया गेला । तैसेच झाले ॥४१४॥
आणि पहा मस्तके मुकुटासकट । जात असती ती तोंडात । पीठ तयांचे आहे होत । पहा देवा ॥४१५॥
काही दातांच्या फटीत ।काही जमा झाली जिभेच्या बुडात । काही दाढांच्या टोकात । फसली पहा ॥४१६॥
विश्वरूपाने गिळले । सर्वांचे शरीर जरी संपले । तरी सूक्ष्म देह ते वाचले । जो जीवभाव ॥४१७॥
या शरीराच्या आत । आत्मतत्त्व जे असे जीवभावात । ते महाकाळाच्याही तोंडात । नष्ट नाही ॥४१८॥
जयांनी शरीर केले धारण । तया मार्ग नाही अन्य । आपैसेच मुखात शिरून । मरताती सारे ॥४१९॥
ऐसी अवघीच ही सृष्टी । आहे प्रलयाच्या वाटेवरती । तया मरणाची ती मिठी । चुकलीच नाही ॥४२०॥
ब्रह्मादिक ते समस्त । उंच मुखाकडे असती धावत । इतर सामान्य ते मरतात । अलीकडच्या मुखी ॥४२१॥
प्राणी जे जन्मासी आले । ते जन्माकारणेच मेले । कोणी कधीच न सुटले । मुखातून याच्या ॥४२२॥
जसे समुद्रात ते शिरून । नद्यांचे प्रवाह होतात विलीन । तस सर्व जीवांचं ते प्रवेशणं । मुखी तुझ्या ॥४२३॥
पहा दिवस रात्रीच्या जिन्यांनी । चाललेत हे सर्व प्राणी । वेगात प्रवेशून वदनी । मरतात हे ॥४२४॥
जशा जळत्या पर्वताच्या दरीत । पतंगाच्या झुंडी प्रवेशतात । तैसे प्राणी सारे घुसतात । मुखात या ॥४२५॥
तप्त लोही पाणी जसे विरते । तसे सर्व प्राणी नष्ट होतात ते । तयांच्या नामरुपाते । वहिवाट पुसली ॥४२६॥
करून एवढे सारे भोजन । याच्या भुकेस न येई उणेपण ।कैसा पेटला जठराग्नी असाधारण ।याच्या पोटी ॥४२७॥
तसा रोगी तपातून उठला । की भिकाऱ्याचा दुष्काळ संपला । तसा ओठ चाटत बसला । जिभेने तू ॥४२८॥
आहाराच्या त्या नावाने । कोणत्याही पदार्थाचे न सुटणे । कसा वखवखला भुकेने । भगवंता तू ॥४२९॥
समुद्रासी एका घोटात प्यावे । की पर्वता घासात संपवावे । वा ब्रह्मांडा दाढेत भरडावे । तैसेच सारे ॥४३०॥
सर्व दिशा घ्याव्यात गिळूनी । वा घ्याव्यात चांदण्या चाटुनि । तैसा तुझ्या भुकेनी । मांडला प्रलय ॥४३१॥
जसा इंधने अग्नी भडकतो । वा भोगाने काम वाढतो । तसा खादाडपणा बळावतो । खाण्याकारणे ॥४३२॥
जसे कवठ ठेवावे वडवानळात । तसे त्रिभुवन ठेवले जिव्हाग्रात । सर्व विश्व असे तू गिळत । निमिषार्धात ॥४३३॥
तुझी अपार ती वदने । आणि असंख्यच ती त्रिभुवने । तुझी भूक भागविण्याकारणे । निर्मिलीस तू ॥४३४॥
जशी जंगलाच्या वणव्यात । बिचारी हरणे ती सापडतात । तैसे त्रैलोक्य असे जळत । तव मुखामाजी ॥४३५॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अकारण नव्हे कर्मच उपजले । जगत पहा आता संपले । मुखामाजी पहा प्रवेशले । विश्व सारे ॥४३६॥
ज्वालाग्नीच्या या पाशातून । विश्वा आता कोण वाचवेन । सुटका जळत्या लाक्षागृहातून । नाही आता ॥४३७॥
अग्नी अंगी अतिदाहकपण । पण अग्नीसी नसे त्याची जाण । जया त्या उष्णतेचं लागणं । तो वाचेच ना ॥४३८॥
आपले ते धारदारपण । शस्त्रासी नसे त्याची जाण । वा जसे आपले ते विषारीपण । न जाणे विष ॥४३९॥
तैसी तुज काही । आपल्या उग्रपणाची जाणीव नाही । परि तुझ्या त्या मुखाच्या खाई । सरे जग ॥४४०॥
अगा आत्मा तू एक । जो सकळ विश्वव्यापक । तरी का आम्हा आतंक । दाखविसी तू ॥४४१॥
माझी सांडली जीवत्वाची चाड । आता तूही न धरावी भीडभाड । मनी आहे ते उघड । सांग आता ॥४४२॥
किती वाढविसी या उग्ररुपा । स्वत:चे भगवंतपण आठवी बापा । निदान माझ्यावर कृपा । कर देवा ॥४४३॥
तुझे वर्णन वेद करती । तू या त्रिभुवनाचा अधिपती । आता माझी ती विनंती । सांगतो देवा ॥४४४॥
ऐसे बोलून भगवंताला । अर्जुनाने चरणस्पर्श केला । आणि मग भगवंतासी म्हणाला । ऐक देवा ॥४४५॥
होण्या मनाचे समाधान । मी म्हटले दाव विश्वरूप दर्शन । आणि सगळेच ते त्रिभुवन । गिळत सुटला ॥४४६॥
भगवंता तू आहेस तरी कोण । इतकी भयंकर मुखे प्रकटवून । आणि शस्त्रे ऐसी परजून । करसी काय ॥४४७॥
पाहून ऐसा रागीटपणे । गगनासीही आणतोस उणे । आणि तुमचे हे डोळे वटारणे । भयंकर देवा ॥४४८॥
कशासाठी तुम्ही देवा । करता त्या यमाचा हेवा । तुम्ही हेतू आपला सांगावा । अंतरीचा ॥४४९॥
यावरी म्हणाले भगवंत । मी कोण हे आहेस तू विचारत । आणि कशासाठी असे वाढवत । उग्रपणा ॥४५०॥

श्री भगवानुवाच

अर्जुना मला काळ म्हणतात । संपविण्यासाठी हे जगत । मी तोंडे असे पसरत । दाही दिशी ॥४५१॥
येथे मग म्हणाला अर्जुन ।उबगलो होतो संकटानं ।म्हणून मागितले विश्वरूप दर्शन ।पण प्रकटले हे काय ॥४५२॥
कठीण अशा या दर्शनानं । निराश होईल अर्जुन । म्हणून म्हणाला तो भगवान । ऐक आता ॥४५३॥
अर्जुना तू पाहिले या संहारास । परि धोका नाही तुम्हा पांडवास । मग धीर आला अर्जुनास । तेव्हा कुठे ॥४५४॥
जो होता घाबरला । तो आता सावध झाला । चित्त मग भगवंताच्या बोला । लागला देऊ ॥४५५॥
मग म्हणाला भगवंत । तुम्ही पांडव माझेच आहात । तुम्हाव्यतिरिक्त सारे जगत । गिळीन मी ॥४५६॥
टाकता त्या अग्नीत । होते लोण्याच्या गोळ्याची वाताहत । तसे सर्व जग माझ्या तोंडात । विलीन होई ॥४५७॥
या संहारात जराही । खोटे काहीच नाही । उगाच बरळणे हे पाही । सैन्याचे अर्जुना ॥४५८॥
या चतुरंग सैन्याकारणे । यांनी काळाशी स्पर्धा करणे । माजून गेले पहा गर्वाने । हे सैन्य सारे ॥४५९॥
म्हणती करू प्रतिसृष्टी निर्माण । मृत्यूसही टाकू मारून । आमचा शत्रू जाईल संपून । क्षणार्धात ॥४६०॥
सगळीच पृथ्वी गिळूनी । टाकू आकाशही जाळूनी । वाऱ्यास ठेवू खिळवूनी । बाणांनी पहा ॥४६१॥
आपल्या शक्तीच्या तोऱ्यात । हे आहेत बा वावरत । स्वत:स असती वाखाणीत । जसे यम ॥४६२॥
बोल धारदार शस्त्राहून । मुद्रा दाहक अग्नीहून । काळकुटाचेही मारकपण । फिके तेथे ॥४६३॥
हे गंधर्व नगरीचे उकळ । वा पोकळीचं भेंडोळं । अथवा चित्रातील जशी फळं । तसे वीर सारे ॥४६४॥
मृगजळी पुराचे दाटणे । वा साप कापडाचा करणे । शृंगारून ते खेळणे । मांडणे जसे ॥४६५॥
जे फुगले गर्वाचेनि बळे । ते मागेच मी गिळले सगळे । हे कुंभाराचे माती पुतळे । निर्जीव असती ॥४६६॥
तुटता कळसूत्राची दोरी । बाहुले उलथोनि पडती सारी । केवळ धक्का लागण्याची देरी । असे तेथे ॥४६७॥
पहा हा सैन्याचा संघात । नष्ट होईल क्षणार्धात । म्हणून लवकरी सावध होत । घाव घाली ॥४६८॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

गोग्रहण प्रसंगात ।आणले मोहनास्त्र तू उपयोगात । कौरवांचे कपडे काढत ।उत्तरानं नागवले त्यांना ॥४६९॥
आता तर खूप सोपे झाले । यांना मी पूर्वीच मारले । हे युद्ध असे जिंकले । आधीच तू ॥४७०॥
संपतील हे क्षणार्धात । आणि येईल राज्य हातात । होऊनी केवळ निमित्त । मार यांना ॥४७१॥
भीष्माचे भय न मानणे । द्रोणाची पर्वा न करणे । कर्णासही ठार मारणे । कर्तव्य तुझे ॥४७२॥
कैसे मारावे जयभद्रास । नको येऊ देऊ या विचारास । सर्व हे जे वीर खास । मरतील सारे ॥४७३॥
हे शत्रूसैन्य आघवे । चित्रातील सैन्यच ते मानावे । ओल्या हाताने बा पुसावे । एका क्षणात ॥४७४॥
तू जाण बा पांडवा । समग्र हा युद्धाचा मेळावा । हा आभास जसा आघवा । स्वप्नातील ॥४७५॥
हे माझीया मुखी पडिले । आहेस बा तू पाहिले । तेव्हाच आहे बा सरले । आयुष्य यांचे ॥४७६॥
म्हणून सत्वर ते उठून । सर्व आसक्ती ती सोडून । टाक या सर्वांना मारून । अर्जुना तू ॥४७७॥
आपणचि निशाण उभारावे । आणि आपणचि ते वधावे । ऐसे युद्ध हे आघवे । मायाच अर्जुना ॥४७८॥
सर्व आधीच आहे ठरले । तुला केवळ निमित्त केले । सर्व असती हे मेलेले । पूर्वीच अर्जुना ॥४७९॥
मातले होते भाऊबंद । तया झाला होता अति मद । म्हणून केला तयाचा वध । अर्जुनाने ॥४८०॥
होता कौरवांची मात । नोंद होईल अशी इतिहासात । पृथ्वी केली दुर्जनरहित । अर्जुनाने ॥४८१॥
ऐसी आघवीच ही कथा । संजय धृतराष्ट्रा सांगत होता । ऐकून वाढली अस्वस्थता । धृतराष्ट्राची ॥४८२॥
मग त्या सत्य लोकाहून । गंगेनं जसं खळाळत येणं । तशा गंभीर वाणीनं । बोलला श्रीकृष्ण ॥४८३॥
जसं ढगांचं भयंकर कडाडणं ।मंदारे सागरमंथन करणं ।तस आवाजाच्या कडाडण्यानं । घुमला परिसर ॥४८४॥
तैसा गंभीर नाद करून । बोलला भगवान श्रीकृष्ण । जो विश्वाचे मूलस्थान । आधार विश्वाचा ॥४८५॥
ते अर्जुनाने थोडेसे ऐकले । नि सर्वांग तयाचे थरथरले । सुख की भय उपजले । हे न जाणे ॥४८६॥
मग दोन्ही कर जोडून । खाली ते वाकून । चरणी मस्तक ठेवून । शरण गेला ॥४८७॥
मन गेले गोंधळून । कंठ आला भरून । भय की सुखाकारण । तुम्हीच जाणा ॥४८८॥
पहा देवाचिया बोले । अर्जुना हे ऐसे जाहले । मिया पदावरून देखिले । श्लोकाचिया ॥४८९॥
मग पुढे भीत भीत । चरणी मस्तक ठेवत । आपण असे म्हणालात । बोलला तो ॥४९०॥
अर्जुना मी असे काळ । गिळणे विश्वासी माझा खेळ । ही तुमची वाणी सत्य अढळ । आहे देवा ॥४९१॥
आज अस्तित्वाचा काळ असता । प्रकटवून ही विश्वरूपता । तुम्ही कैसे विश्वासी ग्रासता । न कळे मज ॥४९२॥
अंगीचे तारूण्य कैसे मोडेल । नसलेले वार्धक्य कैसे येईल । अकाली विश्व न संपेल । संपवू जाता ॥४९३॥
चार प्रहर न सरता । कोणेही वेळी श्री अनंता । सूर्य तो मावळता । देखिला नाही ॥४९४॥
भूत भविष्य वर्तमान । तूच असे बा भगवान । असे तिहींच सबळ असणं । आपापल्या काळी ॥४९५॥
जेव्हा होत असते उत्पत्ति । तेव्हा स्थिती प्रलय हारपती । आणि स्थितीकाळी न मिरवती । उत्पत्ती प्रलय ॥४९६॥
नंतर प्रलयाचिये वेळे । उत्पत्ति स्थिती मावळे । याहून काही ते वेगळे । न होई कधी ॥४९७॥
आज स्थितीचा समय असणे । आणि तू विश्वासी ग्रासणे । न पटेचि माझीया मने । भगवंता हे ॥४९८॥
अर्जुना मी दिला बा संकेत । बघ दोन्ही सैन्ये कशी मरतात । आता थोड्याच वेळात । बघशील तू ॥४९९॥
बोलणं ते ऐकून । अर्जुन पाहू लागला वळून । तेव्हा जगाचं यथास्थित असणं । पाहिलं त्याने ॥५००॥
मग झाला तो बोलता । म्हणे देवा तू विश्वाचा कर्ता । तू विश्वाची पूर्व अवस्था । आणली पुन्हा ॥५०१॥
पडल्यावर त्या दु:खसागरात । भगवंता तूच असे काढत । तुझ्या कीर्तीस असे जाणत । भगवंता मी ॥५०२॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

आठवून कीर्ति वेळोवेळा । भोगतो मी सुखाचा सोहळा । त्या हर्षामृत कल्लोळा । मी लोळत आहे ॥५०३॥
तृप्ती कारणे जगाचा जिवंतपणा । ओढ तुझी सात्त्विकांना । भय वाटे दुष्टांना । भगवंता तुझे ॥५०४॥
त्या त्रिभुवनाचिया राक्षसा । महाभय तू हृषीकेशा । म्हणोनी पळताती दाही दिशा । चोहीकडे ॥५०५॥
येथे सुर नर किन्नर । किंबहुना सर्व चराचर । तुज देखोनी अपार । आनंदित होती ॥५०६॥
येथे गा कवणा कारणा । राक्षस हे नारायणा । न लागताच तुझ्या चरणा । पळून जाती ॥५०७॥
आणि हे काय तुला पुसावे । ते तर आम्हासही जाणवे । कैसे सूर्योदयी रहावे । अंधाराने देवा ॥५०८॥
देवा तू प्रकाशाचा आगर । आम्हासी झाला गोचर । आणि पहा ते निशाचर । पळून जाती ॥५०९॥
इतके दिवस आम्हा । काहीच न समजले श्रीरामा । आता पहात असे महिमा । भगवंता तुझा ॥५१०॥
ही नाना सृष्टी सकल । आणि प्राणिमात्रांचे वेल । हे महद्ब्रह्मातूनच प्रकटलं । तुझ्या इच्छेकारणे ॥५११॥
तू निस्सीम तत्त्व सदोदित । तू नि:स्सीम गुण अनंत । तू नि:सीम साम्य सतत । देवांचाही देव ॥५१२॥
तू त्रिभुवनाचा ओलावा । अक्षर तू सदाशिवा । सत् असत् तू देवा । शब्दातीत ॥५१३॥
तू प्रकृति पुरुष आदि । तू अनुभवा ये समाधी । स्वये तू अनादि । पुरातन ॥५१४॥
तू सकळ विश्वजीवन । जिवासी तूच निधान । भूतभविष्याचे ते ज्ञान । तुझीया ठायी ॥५१५॥
जी श्रुतीचिया लोचना । स्वरूपसुख तूचि अभिन्ना । त्रिभुवनाचिया आयतना । आयतन तू ॥५१६॥
म्हणोनि जी परम । तुला म्हणतो मी महाधन । कल्पांती ते महद्ब्रह्म । विरे जेथे ॥५१७॥
चराचरांत तूच अससी । तूच धारिले अवघ्या विश्वासी । तुझ्या त्या अनंत रूपासी । वर्णावे कोणी ॥५१८॥
येथे नाही तुझी वस्ती । ऐसे ठिकाणच नाही जगती । ठेवतो तुझ्या चरणावरती । मस्तक देवा ॥५१९॥
वायुरुप तू अनंता । यमाचाही तू नियंता । आणि सृष्टीची ही भासमानता । तुझेच ठायी ॥५२०॥
वरुण आणि सोम । सृष्टी आणि ब्रह्म । जगाचा पितामह परम । भगवंता तू ॥५२१॥
सर्व या जगती । जे जे रूप अरूप असती । तयांची ती भ्रमंती । तुझ्याच ठायी ॥५२२॥
ऐसे सानुरागे चित्ते । नमन केले पांडुसुते । आणि पुन: पुन्हा म्हणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥५२३॥
पाठीतिये सांप्रते । न्याहळी श्रीमूर्तीते । आणि पुढती म्हणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥५२४॥
पाहता पाहता मूर्तीते । समाधान पावे चित्ते । आणि पुढती म्हणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥५२५॥
इये चराचरी जी भुते । सर्वत्र देखे तयाते । आणि पुढती म्हणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥५२६॥
ऐसी रुपे ती अद्भुत । जी प्रकटत होती अनंत । त्या सर्वांना नमस्कारीत । होता तो ॥५२७॥
स्तुतीही नव्हती आठवत । आणि निवांतही नव्हते बसवत । पहा कैसा प्रेमभावात । बुडला होता ॥५२८॥
किंबहुना इयापरी । नमन केले सहस्त्रावरी । पुढती म्हणे श्रीहरी । तुला नमस्कार समोरून ॥५२९॥
देवाचे पाठ पोट काही । मजसी ठाऊक नाही । म्हणून तुला पाठमोराही । नमस्कार माझा ॥५३०॥
उभा माझिये पाठीसी । म्हणून पाठमोरा म्हणे तुम्हासी । तुला सन्मुख विन्मुख जगासी । म्हणता न ये ॥५३१॥
आता तुला वेगळाले मानून । न करू शके मी वंदन । म्हणून करतो तुज नमन । एकाच वेळी ॥५३२॥
तुझे बल असे अनंत । तुला नाहीच बा मोजता येत । तू आहेस भेदभाव रहित । सर्वात्मक ॥५३३॥
आकाशामाजी जैसे । आकाशावीण काहीच नसे । तूच सर्वपणे तैसे । वससी जगती ॥५३४॥
किंबहुना केवळ । तूच सर्व जगत निखळ । सागरी जे दिसती लाटांचे कल्लोळ । ते पाणीच सारे ॥५३५॥
देवा तू आणि जगत । भिन्नता नाही दोघांत । हे आले माझ्या ध्यानात । भगवंता आता ॥५३६॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

भगवंता तुझी ही महती । मला नाहीच होती माहिती । म्हणून तुला सखासोबती । म्हटलो मी ||५३७||
देवा फार वाईट झाले । मी अमृताने सडासारवण केले । कोकराच्या बदल्यात दिले । कामधेनुसी ||५३८||
परिसाचा खडक लाभला । तोडून घराच्या पायात घातला । आणि कल्पतरू तो कापला । कुंपणासाठी ||५३९||
चिंतामणी खूप सापडले । पण त्यांनी मी ढोरासी वळले । तैसे मी तुजसी न ओळखले । अज्ञानाकारणे ||५४०||
कशाला सांगू दुसरी बाब ती । आज तुला मी केले सारथी । पहा कशी झाली ही अति । आज येथे ||५४१||
तुला त्या कौरवांच्या घरा । शिष्टाईसी पाठवले दातारा । आमच्यासाठी ईश्वरा । राबलास तू ||५४२||
त्या योग्यांच्या समाधीत । तूच असे तयाना पावत । पण नसल्याने तुला ओळखत । अपराध घडला ||५४३||
देवा तूच मूळ या विश्वाला । पण मी न तूज ओळखला । आणि सोयरिकीचा संबंध लावला । तुजठायी ||५४४||
कधी काळी तुझ्या घरी येता । पावतसे मी मानसन्मानता । आणि मानसन्मान न पावता । रुसतसे मी ||५४५||
मग तू आमच्या पाया पडणे । आणि आम्हासच समजवणे । ऐसे वागलो अज्ञानपणे । बहू आम्ही ||५४६||
तुला नातेवाईक मानून । तुजपुढे कैसेही बसणं । हा अपराध नाही लहान । चुकलो आम्ही ||५४७||
तुजवर दांडपट्टा उभारून । आखाड्यात कुस्ती खेळून । सारीपाटात लबाडी करून । भांडलो मी ||५४८||
चांगले ते मागून घेतले । तुला शहाणपणही शिकविले । आणि तुजसी दूषण लाविले । पहा आम्ही ||५४९||
ऐसे अपराधांचे घडणे । जयांचे त्रिभुवनातही न मावणे । घडले सारे हे अज्ञानपणे । शपथ तुझी ||५५०||
त्या भोजन समयासे । तू माझी आठवण काढतसे । आणि मी रूसून बसत असे । गर्विष्ठपणे ||५५१||
देवा तुमच्याच घरात । नि:शंक होतो खेळत । तुमच्या बिछान्यावरही होतो झोपत । बिनधास्तपणे ||५५२||
अरे-तुरे असे पुकारलो । तुला यादवच समजलो । शपथाही घालून बसलो । देवा तुजला ||५५३||
तुजसवे एकाच आसनी बसणे । मानपान तुझा न ठेवणे । हे घडले अति परिचयाने । मजकडून देवा ||५५४||
असे काय काय आता । सांगू मी भगवंता । अपराधाची अनंत कथा । घडली मजठायी ||५५५||
असे ते वाईट वागणं । अनेकदा घडल मजकडून । पण मजसी माफी देऊन । सांभाळावे देवा ||५५६||
जरी गढूळ पाणी घेऊन । नदीचं सागरी ते येणं । पण सागराने तिला सामावणं । अनिवार्यच देवा ||५५७||
ऐसे जाणते अजाणतेपणे । अनेक अपराधांचे ते घडणे । पण मजसी तू क्षमा करणे । विनंती माझी ||५५८||
देवा तुझ्या क्षमेकारण । प्राणिमात्र जातात तरून । म्हणून माझं हे विनवणं । आहे तुजला ||५५९||
त्या अपराधांना कंटाळून । आलो देवा तुजसी मी शरण । मजसी माफी देऊन । करावी क्षमा ||५६०||
हे पहा भगवंता । सर्वकाही मी जाणले आता । या त्रिभुवनाचा जन्मदाता । तुच आहे ||५६१||
हरी हरादि समस्त । देवा तुच परमदैवत । वेदासही जो असे शिकवत । तो आदिगुरू तू ||५६२||
मी जाणतो तुझे गंभीरपण । सर्वांशी तुझं समत्वानं वागणं । आहेस सकळ गुणांची खाण । भगवंता तू ||५६३||
काय करू तुझे वर्णन । कोणीच नाही तुज समान । भगवंता तूच आकाश होऊन । सामाविले जगा ||५६४||
भगवंता तुझ्या तुलनेत । कोणीच नाही या जगात । तुझे वर्णन जे करू शकतात । ऐसे शब्द नाही ||५६५||
भगवंता या त्रिभुवनात । तूच विश्व होऊन असे नांदत । हे विश्व सारे असे प्रकटत । तुजठायी देवा ||५६६||
ऐसे अर्जुनाने म्हणत । घातला पहा दंडवत । तेथे सात्त्विकभावाचं भरतं । आलं तया ||५६७||
मग डोळ्यांत अश्रू येऊन । विनंती केली अर्जुनानं । काढ या अपराध सागरातून । भगवंता मजला ||५६८||
भगवंता तुला सोयरा मानून । न ठेवला मी तुझा मान । पण माझं ते वागणं । योग्य नव्हतं ||५६९||
तूच असून असाधारण । उधळत असे मजवरी स्तुतिसुमनं । आणि मी अधिकाधिक फुगून । जात असे ||५७०||



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐशा माझ्या या अपराधा । नाहीच भगवंता मर्यादा । परि माझीया त्या प्रमादा । क्षमा करी ||५७१||
तुज विनवण्याजोगी । योग्यता नाही माझ्या अंगी । पण अपत्या जैसी सलगी । करू पाहे ||५७२||
पुत्र जरी बेकार । पण पित्याचे प्रेम अपार ।तैसेच बा तू सहन कर । अपराध माझे ||५७३||
मित्राचे ते उद्धटपण । मित्रा करावे सहन । तसे माझं हे वागणं । कर सहन देवा ||५७४||
देवा प्रियजनांकडून । नाही अपेक्षित कोणी मानपान । उष्ट्या पत्र्यावळ्या उचलून । घेतल्या तुम्ही ||५७५||
जवळचा मित्र तो भेटणे । तया अंतर्यामीची गोष्ट सांगणे । तेथे न काही संकोच वाटणे । तैसे देवा ||५७६||
जसे त्या पत्नीने । पतीसी सर्वभावे शरण जाणे । मनातील सर्वकाही सांगणे । तया जैसे ||५७७||
मी तुजसी शरण येणं । आणि ही विनवणी करणं । त्यासी अजून एक कारण । आहे भगवंता ||५७८||
देवा मी लगट करून । इच्छीलं विश्वरूप दर्शन । आणि तुम्ही बा प्रेमानं । पुरविला हट्ट ||५७९||
कल्पवृक्ष ते लावून । सजविले पहा अंगण । आणि खेळावया दिले आणून । पाडे कामधेनुचे ||५८०||
नक्षत्राचा डाव मांडला । नि चंद्र खेळावया दिला । तैसा माझा छंद पुरविला । भगवंता तू ||५८१||
अमृताचा एक कण । मिळणे तो अतिकठीण । पण तयाचाच पाऊस पाडून । पेरले चिंतामणी ||५८२||
ऐसे कृतकृत्य केले । माझीया इच्छेसी पुरविले । जे शिव ब्रह्माने नव्हते ऐकले । ऐकविले तुम्ही ||५८३||
अतिकठीण ती गोष्ट अनुभवणे । जी उपनिषदही न जाणे । ते आत्मतत्त्वाचे लेणे । दाविले मजसी ||५८४||
कल्पाच्या आरंभापासून । जितके घेतले मी जन्म । त्या सर्वांना पाहिले आठवून । भगवंता मी ||५८५||
त्या सर्व जन्मांची । तपासणी केली मी साची । पण वार्ता ती आत्मतत्त्वाची । नाहीच तेथे ||५८६||
बुद्धिने आत्मतत्त्वा जाणणं । नच कधी ते होणं । बुद्धिपासून ते अंत:करण । दूर आहे ||५८७||
तया कान न ऐकू शकती । आणि न डोळे पाहू शकती । आहे आत्मतत्त्वाची वस्ती । मनइंद्रियातीत ||५८८||
ते विश्वरूप हे आपुले । देवा तू मजसी दाविले । पहा मन माझे झाले । तृप्त देवा ||५८९||
परंतु माझ्या मनात । एक इच्छा असे वसत । घ्यावे वाटे तुजला कवेत । आलिंगुनी देवा ||५९०||
पण कोणे मुखेसी मी बोलणे । आणि कोणा आलिंगन देणे । आहे अमर्याद ते असणे । तुझे देवा ||५९१||
कैसे वाऱ्यासवे ते धावणे । नि गगना अलिंगन देणे । समुद्री जलक्रीडा करणे । अशक्य देवा ||५९२||
तुजला एक मिठी द्यावी । ऐसी इच्छा आहे ती जिवी । तेवढी हौस ती पुरवावी । भगवंता माझी ||५९३||
देवा तुजसी जाणून घ्यावे । नि जगी सुखाने रहावे । तुझे चतुर्भुज रूप आघवे । विसावा आम्हां ||५९४||
योगाचा तो अभ्यास करणे । आणि याच अनुभवा येणे । साही शास्त्रे ती अभ्यासणे । तव दर्शनासाठी ||५९५||
यज्ञाचा ते आयोजन । तेथेही हेच फल प्राप्त होणं । सकल ते बा तीर्थाटन । याचसाठी ||५९६||
आणिकही काही जे जे । दान पुण्य आम्ही किजे । तयासी होई प्राप्त तुझे । रूप चतुर्भुज ||५९७||
तुझ्या दर्शनाची ओढ अपार । म्हणून झालो आहे अधीर । भगवंता दर्शन आता लवकर । द्यावे मजसी ||५९८||
देवा तू विश्वाचाच प्राण । सकल विश्वाचे तुजठायी प्रकटन । भगवंता हो मजसी प्रसन्न । लवकर आता ||५९९||
निळ्या कमळा निळेपण दाविते । आकाशाही रंग लावते । आणि नीलमण्यासही तेज आणते । ते रूप तुझे ||६००||
सुवास प्राप्त झाला पाचूमण्याला । वा भुजा फुटल्या आनंदाला । तैसे लाजवी त्या मदनाला । कमर ऐसी ||६०१||
पहा मस्तक आणि मुकुट । एकमेका आहेत ते शोभवीत । दोघेही असती वाढवत । सौंदर्यासी ||६०२||
इंद्रधनुष्याच्या त्या कमानीवरती । जसे मेघ आकाशी दिसती । तैसी माळ ती वैजयंती ।शोभे देवा ||६०३||
काय वर्णन करू गदेचे । जी उदया आणते भाग्य असुरांचे । आणि चक्र पहा गोविंदाचे । तेजाने मिरवी ||६०४||


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तुझे ते रूप पहाण्याला । मी अधीर असे झाला । म्हणून देवा विनवितो तुजला । हो प्रकट तैसा ॥६०५॥
त्या विश्वरूपाच्या दर्शनानं । गेले पोट माझे भरून । आता दे तू दर्शन । होऊन चतुर्भुज ॥६०६॥
त्या कृष्णरूपावाचून । मला न पडे चैन । दुसरं रूप ते पाहणं । न आवडे मजला ॥६०७॥
भोग मोक्ष सर्वकाही । आम्हासाठी श्रीमूर्तीवीण नाही । म्हणून तैसाच साकार होई । भगवंता आता ॥६०८॥
या अर्जुनाचिया बोला । भगवंता विस्मय जाहला । म्हणे ऐसा नाही देखिला । धसाळ कोणी ॥६०९॥
अलौकिक वस्तू पावला । तियेचा लाभ न घेतला । म्हणे तियेला मी भ्याला । हेकाडू ऐसा ॥६१०॥
आम्ही जेधवा प्रसन्न होतो । जे लौकिक तेच देतो । देई अलौकिकाचा ठेवा तो । विरळाच तो ॥६११॥
केवळ तुझ्याच करता । करून विश्वाची एकता । प्रकटविली ही विश्वरूपता । कष्टाने बा ॥६१२॥
अर्जुना तुझ्या तळमळीकारण ।जाहलो मी प्रसन्न । म्हणून गूढ हे विश्वदर्शन । दाविले तुजसी ॥६१३॥
अर्जुना हे अपरंपार । स्वरूप माझे परात्पर । येथून प्रकटले ते अवतार । कृष्णादिक ॥६१४॥
हे ज्ञान तेज निखळ । आहे विश्वात्मक केवळ । अनंत आणि अढळ । तत्त्व हे ॥६१५॥
केवळ तूच अर्जुना अनुभवले । कोणी न पाहिले न ऐकिले । कधी साधनेनं नच प्रकटले । तत्त्व हे ॥६१६॥
या तत्त्वासी जयानी जाणले । ते वेद मौनचि जाहले । यज्ञ करणारे पृथ्वीलोकी आले । परत स्वर्गातुनी ॥६१७॥
योगात कष्ट अति असती । म्हणून योगाभ्यासी वाळती । शास्त्रांनाही सुलभता ती । नाही येथे ॥६१८॥
सत्कर्म जे करती । ते भवचक्रात राहती । आणि स्वर्गलोक भोगती । सत्कर्माकारणे ॥६१९॥
तपाकारणे ऐश्वर्य भेटते । मग भोगाचे भरते येते । आणि तप करणे सुटून जाते । ऐश्वर्यात ॥६२०॥
हे तुवा अनायासे । पाहिले विश्वरूप जैसे । या मनुष्यलोकी तैसे । न लाभले कोणा ॥६२१॥
या विश्वरूपदर्शना । केवळ पात्र तूच अर्जुना । त्या ब्रह्मदेवाही पाहा ना । हे लाभले नाही ॥६२२॥
तू प्राप्त झालासी विश्वरूपास । त्याग त्याग त्या भयास । मज वाचोनी सर्व विषयास । त्या अर्जुना ॥६२३॥
समुद्र जो अमृताने भरला । जर तो अकस्मात प्राप्त झाला । मग का कोणी त्यागला । बुडेल म्हणून ॥६२४॥
सोन्याचा तो डोंगर । तो नाहीच नेता येणार । म्हणून तयाचा का अव्हेर । केला कुणी ॥६२५॥
चिंतामणी तो प्राप्त होणे । पण ओझे समजुनी टाकणे । घडे कामधेनु का विकणे । न पोसवे म्हणूनी ॥६२६॥
चंद्र आला तो घरास । म्हणे उकाडा तू करतोस । आणि सूर्या म्हणे सावली पाडतोस । निघून जा ॥६२७॥
आज ऐश्वर्य हे ऐसे । हाता आले आपैसे । आणि तुला घबराट कैसे । सुटली अर्जुना ॥६२८॥
कैसा प्राप्त झालासी अज्ञानाला । काय म्हणू मी तुला । शरीर सोडून छायेला । आलिंगतोस तू ॥६२९॥
जे माझे मूळ रूप नसणे । तयासी तू इच्छिणे । बरे नाही तुझे वागणे । जाण अर्जुना ॥६३०॥
इच्छितोस चतुर्भुज दर्शन । टाकून दे ती इच्छा मनातून । त्यातच तुझे कल्याण । आहे अर्जुना ॥६३१॥
विश्वरूप जरी घोर । भासे विकृत आणि थोर । परंतु निश्चय तू धर । तयाचेच ठायी ॥६३२॥
कृपण वृत्ती जैसी । घोटाळते ती धनापाशी । तैसे तू विश्वरूपाशी । राही अर्जुना ॥६३३॥
जेथे पिल्ले असती बापुडे । लक्ष ठेवूनि त्या घरट्याकडे । जशी पक्षिणी आकाशी उडे । तैसे अर्जुना ॥६३४॥
गाय जरी चरे डोंगरी । वासरापाशी चित्त तिचे घरी । तैसे प्रेम तू धरी । विश्वरूपा ॥६३५॥
त्या चतुर्भुज दर्शना । जास्त महत्त्व न द्यावे अर्जुना । जिवाच्या त्या कल्याणा । न ते कामाचे ॥६३६॥
होण्या जिवाचे कल्याण । न विसरावे विश्वरूप दर्शन । या विश्वरूपा ठायीच जाण । कल्याण तुझे ॥६३७॥
कधी नव्हतेच तू देखिले । म्हणून भय तुजठायी उपजले । टाकून दे भय मनातले । अर्जुना तू ॥६३८॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

आता तुझ्या इच्छेप्रमाणे । घे तू चतुर्भुज दर्शन । मी चतुर्भुज होऊन । प्रकटतो आता ॥६३९॥

संजय उवाच

ऐसा बोलताच तो भगवान । प्रकटला चतुर्भुज होऊन । काय करावे ते वर्णन । त्याच्या अर्जुन प्रेमाचे ॥६४०॥
शिष्याच्या त्या इच्छेप्रमाणं । देतसे तया दर्शन । पहा किती करूणावान । भगवंत आहे ॥६४१॥
ते विश्वरूप दर्शन । जरी नाकारलं अर्जुनानं । पण रूप चतुर्भुज प्रकटवून । तोषिले तयासी ॥६४२॥
होण्या अर्जुनाचे कल्याण । वाढण्या सत्याची तहान । पहा किती तत्पर तो भगवान । आहे येथे ॥६४३॥
लगड सोन्याची मोडून । इच्छित अलंकार घडवणं । पण अलंकार न आवडला म्हणून । मोडणे पुन्हा ॥६४४॥
तैसे शिष्याचिया प्रीति पहिले । कृष्णत्व विश्वरूप केले । ते शिष्या न पटले । म्हणून सोडले ते ॥६४५॥
इतके सांभाळती शिष्याशी । असे गुरू कवणे देशी । किती आवडी भगवंताशी । अर्जुनाची आहे ॥६४६॥
विश्वरूप जे प्रकटले होते । ते आवरून घेतले मागुते । आणि रूप चतुर्भुज ते । प्रकटवले आता ॥६४७॥
तैसे द्वैत ते संपून । जावे अद्वैती सामावून । जैसे बीजरूप होऊन । वृक्ष राहे ॥६४८॥
जैसे जाग ती येता । होई स्वप्नांची सांगता । तैसी ती विश्वरूपता । आवरली भगवंते ॥६४९॥
जैसे तेज बिंबी सामावते । नि अभ्र विरते नभाते । वा सामावी त्या भरतीते । समुद्र जैसा ॥६५०॥
अर्जुनाच्या इच्छेकारण । दाविले ते विश्वरूप दर्शन । पण नाही म्हटला म्हणून । आवरले ते ॥६५१॥
जैसे वस्त्र गिऱ्हाईका दाविले । परि तयासी न आवडले । म्हणून पुन्हा घडी घातले । तैसे अर्जुना ॥६५२॥
विश्वरूपाचे ते लेणे । जे प्रकटले होते व्यापकपणे । तेच आता सौम्यपणे । चतुर्भुज झाला ॥६५३॥
अर्जुन घाबरला म्हणून । रूप चतुर्भुज ते प्रकटवून । धीर तयासी देऊन । शांत केले ॥६५४॥
जैसे स्वप्नातून जागता । आश्चर्य वाटते चित्ता । तैसे तो अर्जुन आता । जाहला चकित ॥६५५॥
जैसे गुरुकृपा होता । ओसरते पंचभुतांची ती सत्ता । आणि आत्मतत्त्व तत्त्वत: । अनुभवा येते ॥६५६॥
त्या विश्वरूप दर्शनानं । भय जे धरले होतं अर्जुनानं । ते आता गेले निघून । चतुर्भुज पाहता ॥६५७॥
त्या काळासी जिंकला । वा वादळात वाचला । नि तरुन समुद्र गेला । अर्जुन जैसा ॥६५८॥
तैसे चतुर्भुजरूप पाहून । गेला अर्जुन आनंदून । संतोषानं गेलं भरून । मन त्याचं ॥६५९॥
सूर्य जाता अस्तमानी । जशा चांदण्या उगवती गगनी । तैसी देखू लागला अवनी । अर्जुन तेथे ॥६६०॥
रणांगणी पाहिलं अर्जुनानं । करत होते पहा आप्तजन । बाण वर्षाव भीषण । कुरुक्षेत्री ॥६६१॥
झडत होत्या बाणांच्या फैरी । नि अर्जुन बैसला भूमिवरी । आणि भगवान श्रीहरी । धुऱ्यावर ॥६६२॥

अर्जुन उवाच

पाहून त्या चतुर्भुजाला । अर्जुनासी धीर आला । वाचलो ऐसे स्वत:शीच म्हणाला । अर्जुन तेथे ॥६६३॥
बुद्धि सोडून त्या ज्ञानाला । होती लागली देशोधडीला । नव्हता पारावार राहिला । भयासी माझ्या ॥६६४॥
इंद्रिये प्रवृत्ति भुलली । वाचा प्राणासी चुकली । ऐसी दुर्दशा होती झाली । भगवंता माझी ॥६६५॥
या चतुर्भुज रूपाकारण । भेटले मला पुन्हा जीवन । चतुर्भुज रूप दाखवून । वाचवले मजला ॥६६६॥
अर्जुन मनी खूश झाला । आणि मग भगवंतास म्हणाला । तुझ्या त्या मनुष्यरुपाला । पाहिले मी ॥६६७॥
मजसी विश्वरूप दाखवून । केले माझे समाधान । जैसे करी स्तनपान देऊन । माता अपत्याचे ॥६६८॥
विश्वरूपाच्या सागरात । तरंग होऊन होतो वावरत । पण निजरूपाची ओळख देत । वाचवलेस तू ॥६६९॥
काय सांगू तुझे उपकार । पहा या सुकलेल्या झाडावर । केलास वर्षाव तो अपार । भगवंता तू ॥६७०॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

पहा तहान माझी फिटली । अमृतसिंधूची भेट झाली । मरणाची भीती संपली । भगवंता आता ॥६७१॥
माझ्या या हृदयात । बा आनंद आहे बरसत । त्या सुखासी पहा समेट । जाहला माझा ॥६७२॥

श्री भगवानुवाच

अर्जुनाचे बोलणे ऐकून । काय म्हटला तो भगवान । विश्वरूपी प्रेम ठेवणं । महत्त्वाचं अर्जुना ॥६७३॥
विश्वरूप ध्यानी ठेवावे । नि मग मूर्तीसी पहावे । हे शास्त्र ते आघवे । विसरला अर्जुना तू ॥६७४॥
आलीया मेरूही हातात । आंधळ्यास महत्त्व नाही वाटत । म्हणून वाट ते चुकतात । ज्ञानाची अर्जुना ॥६७५॥
तप ते करून । शंकराही जे प्राप्त न होणं । ते विश्वरूप दर्शन । दाविले तुजसी ॥६७६॥
जे अष्टांगयोग अनुसरती । ते योगी दु:ख भोगती । परि नाही तयाची भेट ती । ज्ञानासी अर्जुना ॥६७७॥
त्या विश्वरूपासाठी । पहा देवही ते झुरताती । परि कधी न ते अनुभवती । या विश्वरूपा ॥६७८॥
एका थेंबाची आशा ठेवून । चातकाचं आकाशी पहाणं । तैसी जयाची तहान । तया प्राप्ती त्याची ॥६७९॥
पाहण्या ती विश्वरूपता । उत्सुक असती त्या देवता । तयांनाही विश्वरूपाचा पत्ता । न लागे कधी ॥६८०॥
ते विश्वरूप दर्शन । स्वप्नीहि जे न प्राप्त होणं । ते तू प्रत्यक्ष डोळ्यानं । अनुभवले असे ॥६८१॥
कोणत्याही उपायानं । न तयाच प्राप्त होणं । साही शास्त्र अन् वेदानं । घेतली माघार तेथे ॥६८२॥
होण्या विश्वरूपाचे दर्शन । येथे नाही काहीच साधन । उपासना अन तपश्चर्येनं । न प्राप्ती माझी ॥६८३॥
त्या दानात आणि यज्ञात । नाहीच बा मी सापडत । जसे तू अयाचित । अनुभवले मजसी ॥६८४॥
फक्त त्या तळमळीकारण । माझी बा प्राप्ती होणं । चित्ता वरता त्या भक्तीनं । अनुभूती माझी ॥६८५॥
पर्जन्याची धारा जैसी । पृथ्वीवाचून न थांबे जराशी । जयाच्या मनी तळमळ ऐसी । त्यासी प्राप्ती माझी ॥६८६॥
जैसे समुद्र भेटेपर्यंत । गंगा असे धावत सतत । तैसे जयाचे चित्त । तया प्राप्ती माझी ॥६८७॥
मनइंद्रियांसी तादात्म्य तुटता । भावभावना विचार सरता । सर्व इच्छा वासना संपता । भेट माझी ॥६८८॥
काठावर आणि मध्यात । समुद्र तो एकच असे असत । तसे सर्व प्राणिमात्रात । अस्तित्व माझे ॥६८९॥
एवढ्याशा बा मुंगीत । आणि सर्व त्या चराचरांत । मीच असे वावरत । सर्वांठायी अर्जुना ॥६९०॥
जगी जे काही दिसणे । ते सर्व आपणचि होणे । ऐशी अनुभूती अंतरी येणे । भक्ती अर्जुना ॥६९१॥
अग्निमाजी लाकूड पेटते । मग लाकूडपण संपते । लाकूड ते स्वत:च होते । अग्नी जैसे ॥६९२॥
जोवरी सूर्य न उगवला । तोवरी अंधाराचा घाला । एकदा का सूर्योदय झाला । मग प्रकाश चोहीकडे ॥६९३॥
तैसे माझिये साक्षात्कारी । संपे अहंकाराची वारी । द्वैताची भाषा अंतरी । संपून जाई ॥६९४॥
ऐसे जगासी एकत्व जाणावे । मग जगचि होऊनी रहावे । ऐसे जाणणे मजसी स्वभावे । भक्ती अर्जुना ॥६९५॥
केवळ माझ्याचसाठी । जो वर्ते जगरहाटी । मी वाचोनि तयाची दिठी । न पाहे काही ॥६९६॥
दृश्य अदृश्य सकळ । जयासाठी मीच केवळ । अंतरी माझीच तळमळ । सदैव त्यासी ॥६९७॥
दुजेपणाची भाषा विसरला । सर्व जग आपणचि झाला । ऐसा निर्वैर होऊनी ठेला । जगती तो ॥६९८॥
ऐसी अनुभूती येता । संपते त्रिगुणाची ती सत्ता । मग मीच होऊनी सर्वथा । राहे जगती ॥६९९॥
जगाचं असे आपल्यात सामावणं । तेच भक्ती आणि ज्ञान । तयासीच विश्वरूप दर्शन । म्हणतात अर्जुना ॥७००॥
ऐसे त्या भगवान कृष्णानं । अर्जुनासी सांगितले ज्ञान । पहा किती भाग्यवान । अर्जुन होता ॥७०१॥
पण त्या अर्जुनाने । दोन्ही मूर्ती घेतल्या न्याहाळून । त्या विश्वरूपाहून चतुर्भुज दर्शन । आवडले त्याला ॥७०२॥
पण अर्जुनाचं हे मानणं । अमान्य केलं देवानं । केव्हाही महत्त्वाचं व्यापकपण । त्या पृथकपणाहून ॥७०३॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

हेच समर्थावयालागी । अजून एक दोन चांगी । युक्ती तो सारंगी । सांगता झाला ||७०४||

ते सर्व ऐकून । मनी म्हणाला अर्जुन । काय कल्याणकारी दोन्हीतून । विचारील आता ||७०५||

ऐसे मनन करून । जे काही विचारील अर्जुन । ते होईल बा कथन । पुढील अध्यायी ||७०६||

उपयोग करून ओवीचा । सांगेन भाग तो पुढचा । ऐसे म्हणाला दासनिवृत्तीचा । ज्ञानदेव ||७०७||

सद्भावाची ओंजळ करून । मोकळी फुले वोवून । मग चरणी केले ते अर्पण । विश्वरूपाच्या ||७०८||

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे विश्वरूपदर्शनयोगोनाम एकादशोऽध्याय: ||११||



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्‌मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्‌गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे ह्दगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com
ई साहित्य प्रतिष्ठान®
www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळ्यांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९९६७४८२०